जा.क्र.कबचौउमवि/रासेयो-१४-क/अध्यादेश/१६३/१३०/२०२५ दि.२५/०३/२०२५

**तत्काळ ई-पत्र**

प्रति,

मा.प्राचार्य / संचालक/विभाग प्रमुख,
राष्ट्रीय सेवा योजनेचे शासन अनुदानित व स्वंयनिर्वाहित एकक असलेले महाविद्यालये,
मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना...

**विषय :-** विद्यापीठ अध्यादेश १६३ अंतर्गत प्रोत्साहन गुणांचे अर्ज सादर करणेबाबत...

**संदर्भ:-** जा.क्र.कबचौउमवि/रासेयो-१४-क/अध्यादेश/१६३/११३/२०२५,दि.०८/०३/२०२५

**महोदय / महोदया ,**

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्ये अध्यादेश १६३ अतर्गत प्रोत्साहनपर गुणलाभ राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S) मध्ये सहभाग नोंदवून उल्लेखनीय कार्य केलेल्या पात्र विद्यार्थ्यांचे प्रोत्साहनपर गुणलाभ मागणी अर्ज **मंगळवार दि.२५ मार्च,२०२५पर्यंत** रासेयो कार्यक्रम अधिकारी,मा.प्राचार्य,रासेयो जिल्हा समन्वयक यांच्याकडून पडताळणी करुन संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावे. या नंतर लींक बंद करण्यात येईल.MKCL ने विकसित केलेला Assesment Data Entry Software (ADES) द्वारे राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्राअंतर्गत प्रोत्साहनपर १० गुणांची नोंदणी केल्यानंतर तद्नंतर आपले प्रतिनिधीव्दारे अपलोड केलेल्या अर्जाची प्रत काढून त्या सोबत सात दिवसीय शिबीर उपस्थिती पत्राची सत्य प्रत जिल्हा समन्वयक यांचे कडून पडताळणी मा.प्राचार्य / संचालक यांच्या शिफारशीसह विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागात सादर करण्यात यावे असे आपणास कळविण्यात आलेले आहे.अद्याप पर्यत बऱ्याच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी अध्यादेश १६३ अंतर्गत प्रोत्साहनपर गुण लाभ अर्ज अपलोड करण्याची प्रक्रीय ही केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, अध्यादेश १६३ अतर्गत प्रोत्साहनपर गुणलाभ राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S) मध्ये सहभाग नोंदवून उल्लेखनीय कार्य केलेल्या पात्र विद्यार्थ्यांचे प्रोत्साहनपर गुणलाभ मागणी अर्ज अपलोड करण्या करीता **सोमवार दि.३१ मार्च,२०२५** पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे,सदर मुदतीत आपण अर्ज अपलोड करण्याची प्रक्रीयान केल्यास विद्यार्थी अध्यादेश १६३ अंतर्गत प्रोत्याहनपर गुणलाभा पासून वंचित राहिल्यास त्यास राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी सर्वस्वी जबाबदार राहील.

**अभासी पध्दतीने अध्यादेश १६३ अंतर्गत प्रोत्साहनपर गुण लाभ अर्ज सादर करण्यासाठी विशेष सूचना : -**

१.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी आपल्या महाविद्यालयाच्या लॉगीन (Login)(https://apps.nmu.ac.in ) मधून ऑनलाईन (Online) अध्यादेश १६३ चा अर्ज भरावयाचा आहे.

२.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी अध्यादेश १६३ चा अर्ज सविस्तर बिनचुक भरणे आवश्यक आहे.त्या सोबत रासेयो स्वंयसेवकांचे परीक्षा प्रवेशपत्र (Hall Ticket),रासेयो दैनदिनी स्कॅन करुन अपलोड करण्यात यावी.

३.अध्यादेश १६३ ची माहिती परीपुर्ण भरुन झाल्यावर आपल्या महाविद्यालाच्या लॉगीन (Login) मधून ऑनलाईन (Online) ॲप्रुव्ह (Approve)करावे.विद्यापीठाने आपणास दिलेल्या मुदतीत सदर माहिती ॲप्रुव्ह (Approve) न केल्यास संबधीत महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी जबाबदार राहतील.

४.अध्यादेश १६३ ची माहिती परीपुर्ण भरुन ॲप्रुव्ह (Approve) केल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून त्यास राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक यांचे कडून शहनिशा करुन मा.प्राचार्यांच्या शिफारशीसह विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षास दिलेल्या मुदतीत सादर करावे.

५.अध्यादेश १६३ ची माहिती महाविद्यालाच्या लॉगीन (Login) मधून जनरेट झालेली यादी सोबत जोडावी.

६. लॉगीन (Login) (https://apps.nmu.ac.in ) पासवर्डसाठी मा.संचालक राष्ट्रीय सेवा योजना यांच्याशी सपंर्क करावा- मो.क्र-७५८८७२७२६८, कार्यालयीन फोन नं.०२५७-२२५७३४९/३५०

आपला विश्वासू,

(डॉ.सचिन ज.नांद्रे)

संचालक,राष्ट्रीय सेवा योजना

**टिप:-**१) सन-२०२४-२५ चे विशेष शिबीर उपस्थितीपत्रक सत्यप्रत(photocopy)विद्यार्थी अर्ज,(Hard Copy)विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागात जमा करावेत.

२.अध्यादेश १६३ अर्ज आपल्या महाविद्यालयाचे लॉगीन (Login) (https://apps.nmu.ac.in ) मधून ऑनलाईन (Online) भरण्यासाठी मा.प्राचार्य,रासेयो कार्यक्रम अधिकारी यांच्या ईमेल आयडीवर टाकण्यात आलेला आहे कृपया त्या नुसार प्रोत्साहन पर गुणलाभ अर्ज अपलोड करण्याची प्रकीया करण्यात यावी.

**प्रतिलिपी :-**१)विभाग-जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक

२) मा.संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ,कबचौउमवि,जळगाव

**प्रत :-**१) विभाग प्रमुख,कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि,जळगाव.

२) विभाग प्रमुख,प्र-कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि,जळगाव

३) विभाग प्रमुख, कुलसचिव कार्यालय,कबचौउमवि,जळगाव

४) जपसंपर्क अधिकारी, कबचौउमवि,जळगाव

५)पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र,कबचौउमवि,जळगाव-कृपया सदरच्या पत्रकास प्रसिध्दी व विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकट करण्याची कार्यवाही करावी.

D: kka Ord. 163 Circular 219